# महाराष्ट्र मेट्रो रेल कॉर्पोरेशन लिमिटेड
# (नागपूर मेट्रो रेल प्रकल्प )

## महा मेट्रो नागपूर आणि इन्स्टिटयूट ऑफ चार्टर्ड अकाउंटंट्स ऑफ इंडिया तर्फे कार्यशाळा





नागपूर: सायबर फ्रॉडचे वाढते प्रकरण बघता त्याबद्दल सावध करण्या संबंधी महा मेट्रो नागपूर आणि इन्स्टिट्यूट ऑफ चार्टर्ड अकाउंटंट्स ऑफ इंडिया (ICAI), नागपूर शाखा यांच्या संयुक्त विद्यमाने कार्यशाळा मेट्रो भवन येथे आयोजित करण्यात आली. सायबर फ्रॉड सोबत डिजिटल पेमेंट्स व त्या संबंधी सुरक्षात्मक उपाययोजना, निवृत्ती नियोजन व वारसाहक्क, म्युच्युअल फंड, विमा आणि गुंतवणुकीचे पर्याय यासारख्या महत्वाच्या विषयांचा देखील या कार्यशाळेत समावेश होता. एकूणच कर्मचाऱ्यांमध्ये आर्थिक साक्षरतेचा प्रचार आणि प्रसार करण्याच्या उद्देशाने हि कार्यशाळा आयोजित करण्यात आली.

या कार्यक्रमात महा मेट्रोचे संचालक (स्ट्रॅटेजिक प्लॅनिंग) श्री. अनिल कोकाटे,आणि संचालक (वित्त) श्री. हरेन्द्र पांडे यांची प्रमुख उपस्थिती होती. याशिवाय, इन्स्टिट्यूट ऑफ चार्टर्ड अकाउंटंट्स ऑफ इंडिया नागपूर शाखेचे सीए दिनेश राठी,स्वरूपा वझलवार,दीपक जेठवाणी, स्पीकर सीए जितेंद्र सगलानी पदाधिकारीही कार्यक्रमास उपस्थित होते. त्यांनी उपस्थित कर्मचाऱ्यांना मार्गदर्शन करताना आजच्या गतिमान आर्थिक युगात आर्थिक साक्षरतेचे महत्त्व अधोरेखित केले.

प्रमुख वक्ते श्री जितेंद्र सगलानी आणि  आणि इन्स्टिटयूट ऑफ चार्टर्ड अकाउंटंट्स ऑफ इंडिया (ICAI), नागपूर शाखेचा पदाधिकाऱ्यांनी सायबर फसवणुकीचे, त्यापासून बचाव करण्याचे मार्ग, गुंतवणुकीसंबंधी महत्वाच्या सूचना, तसेच निवृत्ती नंतर आणि वारसाहक्कासंबंडी अनेक महत्वाच्या मुद्यांवर प्रकाश टाकला.

कर्मचाऱ्यांना मार्गदर्शन करताना श्री. अनिल कोकाटे यांनी सांगितले कि प्रत्येकानी  आपल्या आयुष्यात गुंतवणूक करावी तसेच विमा काढावा. कुठलेही आर्थिक व्यवहार करताना आवश्यक ती खातीरजमा करूनच मग गुंतवणूक करावी, असे आवाहन देखील त्यांनी केले. आपल्या संबोधनात श्री. हरेंद्र पांडे यांनी सायबर फसवणुकीच्या विविध मुद्द्यांवर प्रकाश टाकला तसेच गुंतवणूक करताना नेमक्या कुठल्या बाबींचा विचार करायला हवा या संबंधी भाष्य केले. तुमच्याकरता काय योग्य आहे याचा संपूर्ण अभ्यास करून नंतरच गुंतवणूक करावी असे आवाहन त्यांनी या मेट्रो कर्मचाऱ्यांना केले.

या कार्यशाळेचे प्रमुख उद्दिष्ट महा मेट्रोच्या कर्मचाऱ्यांना त्यांच्या वैयक्तिक आर्थिक व्यवस्थापनासाठी आवश्यक ज्ञान आणि साधने प्रदान करणे हे होते. इन्स्टिटयूट ऑफ चार्टर्ड अकाउंटंट्स ऑफ इंडियाचे विषयतज्ज्ञांनी माहितीपूर्ण सत्र घेत डिजिटल व्यवहार सुरक्षितपणे कसे करावेत, निवृत्तीनंतरची आर्थिक तयारी, योग्यपद्धतीने गुंतवणुकीचे निर्णय घेणे आणि आर्थिक फसवणुकीपासून स्वतःचे संरक्षण कसे करावे, यावर सखोल मार्गदर्शन केले. कार्यशाळेला महा मेट्रोच्या विविध विभागांतील कर्मचाऱ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. कर्मचाऱ्यांच्या कल्याण व सर्वांगीण विकासाच्या दृष्टीने महा मेट्रोच्या कटिबद्धतेचे हे प्रतिक होते.